**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक - ५८**

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.३.११.२०२२ रोजी उपसमिती बैठक क्र.५७ झालेनंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक/ मुख्यलेखापाल |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.संदिप कारंजे | नगरअभियंता |
| ५ | मा.लक्ष्मण चलवादी | सहा.संचालक नगर रचना |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | १०६ | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 सह च्या अनुषंगाने कलम 23 (1) नुसार सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची तृतीय सुधारीत विकास योजना (2024-2044) तयार करण्याचा इरादा जाहिर करणे, कलम 24 नुसार " नगर रचना अधिकारी " यांची नियुकी करणे बाबत.<br>1)शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि.पी. एस. नं 1702/454/सीआर-52/ओ/युडी-13, दि.15 ऑक्टोबर 2004 अन्वये सोलापूर महानगरपालिका शहरासाठी द्वितीय सुधारित विकास योजना (1997-2004) मंजूर असून ती दि.16 डिसेंबर 2004 पासून अंमलात आलेली आहे व सदर विकास योजनेच्या वगळलेल्या भागास ईपी नं-1707/818/सीआर-709/07/युडी-13 दि.07/08/2008 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.<br>त्यानंतर सोलापूर शहरातील जुळे सोलापुर भाग 1 व 2 ची पहीली सुधारीत विकास योजना न. वि. विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस/1715/1057/सीआर-286/15/डीपी सॅन्क्शन/युडी-13 दिनांक 09-01-2016 अन्वये | मा.सहा. संचालक नगर रचना | प्रकरणी प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. |

उ.स.बै. ५८
पान ९१६

मंजुर झालेली आहे व ती दिनांक 28/09/2016 पासून अमंलात आहे.

सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.157 दिनांक 20/02/2021 अन्वये GIS प्रणाली वापरुन नव्याने जुळे सोलापूर 1 व 2 यासह संपूर्ण सोलापूर शहराची एकत्रित तृतीय विकास योजना (2024-2044) करणेस व ठराव क्र. 157 दिनांक 24/09/2021 अन्वये विकास योजना तयार करणे व नगर रचना सोलापूर महानगरपालिका यांना सहकार्य करणेसाठी शासनाच्या निवडसुची मधील खाजगी संस्थांकडून मान्यता दिलेली निविदा प्रकिया अंती सल्लागार कंपनी RSI, हेद्राबाद यांची नेमणूक करणेस व सदरची सुधारित विकास योजना करणेकरिता स्वतंत्र DP युनिट स्थापन करणेस खर्चासह मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र विघयो-3821/1961/प्र.क्र.307/नवि-27 दि.10/10/2022 अन्वये सोलापूर शहराची वि. यो. सुधारित करण्यासाठी नगर रचनाकार वि.यो.वि.घ. सोलापूर मनपा, सोलापूर हे स्थानांतरित केलेले आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये सोलापूर महानगरपालिका तृतीय सुधारीत विकास योजना (2024-2044) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार सोलापूर महानगरपालिकाच्या तृतीय सुधारीत विकास योजने मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा व मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी स्वाक्षांकिंत केलेला नकाशा, सोलापूर महानगरपालिकेच्या नगर रचना कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा.

विकास योजना तयार करण्याचा सोलापूर महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावा. सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 60 दिवसांचे कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना / हरकतीचा विचार, विकास योजना तयार करतांना करण्यात यावा.<br>2) तसेच विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरिता, त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन शासनाकडे सादर करण्यासाठी त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरिता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. "नगररचना अधिकारी " मा. सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांची पूर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर " नगररचना अधिकारी " यांच्या नियुक्तीचे ओपचारीक आदेश मा. आयुक्त, सोमपा यांनी पारीत करावे.<br>विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे तसेच उक्त अधिनियमाचे तरतूदीनुसार मुदतवाढ मंजूर करण्याची अधिकार मा. आयुक्त, सोमपा यांना देण्यात येत आहेत. तद्संबंधी लागणा-या सर्व खर्चासमा. सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा असितत्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.11/03/2022 ने गठीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.20/10/2022 ने आलेले प्रकरण. (ई-24916 TP) | | |
| २ | १०७ | सोलापूर महानगरपालिका, सोलापूर मालकीच्या गट क्र. व उपविभाग ३८/१/क/२ क्षेत्र ०.८० हेक्टर व गट क्रं व उपविभाग क्र.४४/अ/पैकी क्षेत्र ०.८० हेक्टर असे एकुण जागेचे क्षेत्रफळ १.६० हेक्टर म्हणजे १६००० चौ.मी इतके असून प्रस्तुत ठिकाणी हायवे ॲमेनटी सेंटर बांधणेकामी मा.सर्वसाधारण ठराव क्र. ४४५ दि.०५/०२/२०२२ अन्वये पारित झाला आहे. सदरच्या ठरावास अनुसरून इमारत बांधणेकामी जाहिरप्रसिध्दीकरण करून मुल्यनिविदा मागविली असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही. तदनंतर नमूद ठिकाणी सुधारित योजना तळमजला व परिसर सुधारणा करणेकामी सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र.५० र.रु.११,९१,९१,६६८.०० इतकेचे तयार करण्यात | नगर अभियंता | प्रकरणी प्रस्तावात नमूद अ,ब, व ड यास धोरणात्मक मान्यता देण्यात येत आहे. क मध्ये नमूद प्रमाणे २९ वर्षे ११ महिनेनंतर काही रक्कम लिलाव पात्र धारकास परत द्यावी ही बाब |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आले असून यास मा.नगरअभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. उपरोक्त नमूद ठिकाणी मूळ योजना तळमजला, पहिला मजला दुसरा मजल्याची भाडेदरानुसार ई- ऑक्शन प्रणालीच्या माध्यमातून प्रतिसादर न मिळाल्याने प्रस्तुत प्रकरणी स्कोप ऑफ वर्क कमी करून व तसेच मा.सहा.संचालक नगर रचना यांनी त्यांच्याकडील दि.२१/११/२०२१ अन्वये देण्यात आलेल्या भाडेदरानुसार गाळ्याचे भाडे प्रति चौ.मी. कपात करून कपातीच्या दरानुसार ई- ऑक्शन करणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश दिले होते. यानुसार प्रस्तुत सुधारीत योजनेचा तळमजलाकरीता ई-ऑक्शन जाहिरप्रसिध्दीकरण दि.१५/०७/२०२२ देण्यात आले होते. सदरच्या जाहीरप्रसिध्दीकरणास कोणतेही स्वरुपाचे प्रतिसाद मिळाले नाही. यामुळे मा.आयुक्त यांनी वर नमूद ठिकाणच्या मोकळ्या जागेकरीता (पेट्रोलपंप साठी राखीव असलेल्या जागे व्यतिरिक्त उर्वरीत जागा) ई - ऑक्शन ने हायवे ॲमेनीटी सेंटर या वाणिज्य वापरामधील फुड कोर्ट / इलेक्ट्रीक चार्जिंग स्टेशन - सर्व्हिस एरिया / गार्डन / पार्किंग करीता जाहिर प्रसिध्दीकरण करणेकरीता आदेश दिलेले आहेत. नमूद ठिकाणी बांधकाम व परिसर विकास कामासाठी अंदाजे र.रु.११,९१,९१,६९०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च हा वर नमूद ठिकाणाचे इमारत बांधकाम व परिसर सुधारणा करणेसाठी र.रु.३२,३८९.०० प्रती चौ.मी इतका होत असून यामध्ये वर नमूद ठिकाणाचे बांधकाम व नमूद ठिकाणाचे बांधकाम व नमूद केलेले विकास कामे यांचा अंतर्भूत समावेश आहे.वरील प्रमाणे बांधकाम व परिसर विकास कामासाठी संबंधीत लिलाव पात्र धारकाने खर्च केलेनंतर २९ वर्षे ११ महिनेनंतर/ करारपत्राची मुदत संपल्यानंतर जागेवर वर नमूद ठिकाणी बांधकाम केलेली इमारत व इतर कामे जागेवर आहे त्या स्थितीत म.न.पा. च्या ताब्यात देणेची आहेत तेव्हा सदर बांधकामासाठी होणारा खर्चापैकी काही रक्कम पात्र लिलाव धारकास खर्च रकमेच्या किती रक्कम २९ वर्षे ११ महिनेनंतर परत द्यावयाचे आहे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस व प्रस्तुत प्रस्तावानूसार अ,ब,क व ड मध्ये नमूद केलेले नुसार कार्यपध्दती निश्चित करणेकामी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. यास्तव मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे. तसेच क मध्ये नमूद प्रमाणे मान्यता द्यावयाचे झाल्यास पात्र लिलाव धारकास जागेवरील बांधकाम व विकासापोटी २९ वर्षे ११ महिनेनंतर काही रक्कम लिलावपात्र धारकास परत द्यावी लागणार आहे याबाबत सदर मंजूर लिलावपात्र धारकास २९ वर्षे ११ महिनेनंतर द्यावयाच्या रकमेबाबत प्रस्तावित नमूद प्रमाणे योग्य तो निर्णय होणेस<br>बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे | नामंजूर करण्यात येत आहे. |

३ म ७ ५८
५।७।२४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे २०/१०/२०२२ ने आलेले प्रकरण. (ई-३९९८७)CE | | |
| ३ | १०८ | तुळजापूर रोड येथील जुन्या कचऱ्याव बायोमायनिंग करून त्यामध्ये निघणारे inert वेस्ट करीता लागणारी लँडफिल विकसित करणेच्या अनुषंगाने तुळजापूर रोड येथी कचरा डेपो येथे जून्या कचऱ्यावर बायोमायनिंग करून त्या माध्यमातून intert Material साठी SWM मार्गदर्शन / नियमावली नुसार सॅनिटरी लँडफिल साईट विकसीत करणेकामी प्राप्त परिस्थीती नुसार, अंदाजपत्रक र.रु.९,८४,६२,९१२/- इतकेचे तयार केले आहे त्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे T.S अंती प्रस्तुत रक्कम मध्ये कमी अथवा जास्त होणेची शक्यता नाकारता येत नाही. सबब यांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून तांत्रिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेस व येणारा खर्च **बजेट** - SWM -२ मध्ये खर्ची टाकणेस तसेच प्रस्तुत कामापोटी स्वच्छ भारत मिशन (भाग -२) अंतर्गत अनुदान मागणी करणेकामी मा.सर्वसाधारण सभेची प्रस्तावित प्रमाणे मान्यता मिळणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२१/१०/२०२२ ने आलेले प्रकरण. **(ई-७८६९८) CE** | **मा.नगर अभियंता** | **प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |
| ४ | १०९ | सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे शेळगी येथील महानरपालिकेच्या भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब या जागा मंजुर विकास योजना नुसार रहिवास विभागात समाविष्ठ आहे. सदर जागा रहिवास विभागातून, C&D Waste Plant चे आरक्षण ठेवणेबाबत चे मा.आयुक्त यांचे दि.२०/१०/२०२२ अन्वये आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले<br>शासनाकडील निर्णय क्र.स्वमअ-२०२०/प्रक्र२३/नवि-३४ दि.२८/०१/२०२० अन्वये सोलापूर शहराकरीता १५० (TPD) प्रकल्प क्षमता असलेला C&D Waste Plant तयार करणेसाठी प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. त्यामुध्ये एकूण प्रकल्प किंमत र.रु.७.५२३५ कोटी प्रकल्प किंमत असून त्यातील केंद्र शासन हिस्सा ३५% म्हणजेच | **मा.सहा. संचालक नगर रचना** | **प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |

(र.रु.२.६३३३ कोटी) राज्य शासन हिस्सा २३.३% म्हणजेच (र.रु.१.७५३ कोटी) व उर्वरित म.न.पा.हिस्सा र.रु.३.१३७३ कोटी प्रमाणे मंजुर करणेत आलेले आहेत.

प्रकरणी मौजे शेळगी हद्दीतील म.न.पा. मालकीचे भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब या जागेचा मंजुर विकास योजना आराखडा (१९९७-२०१७) नुसार रहिवास वापर विभागात समाविष्ठ आहे. नमुद ठिकाणी उपरोक्त प्रकल्प राबविणेचे असल्याने जागेच्या वापरात बदल करणे आवश्यक आहे. त्याकरीता म.प्रा.व न.र. १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी लागणार आहे.

म.न.पा. हद्दीतील मौजे शेळगी येथील महानरपालिकेच्या भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब जागेच्या रहिवास विभागातून C & D Waste Plant चे आरक्षण ठेवणेकामी म.प्रा.व न.र. अधिनियम चे १९६६ चे कलम ३७ नुसार बदल करणेस तसेच म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी जाहिरप्रसिध्दीकरण करुन प्राप्त झालेल्या हरकती सुचना यावर सुनावणी घेऊन अंतिम फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतु सो.म.पा. मध्ये सध्या सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व प्रशासकीय कार्किद चालू असल्यामुळे दि.११/०३/२०२२ ने गटीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचेकडेस **मान्यतेस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२०/१०/२०२२ च्या मान्यतेने आलेले प्रकरण. **(ई-७८७०३) TP**

मा.नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका

मा.सहा.संचालक,नगर रचना
सोलापूर महानगरपालिका

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.१०६ ठराव क्र.१०६ दिनांक.०३/११/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )



महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 सह च्या अनुषंगाने कलम 23 (1) नुसार सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची तृतीय सुधारीत विकास योजना (2024-2044) तयार करण्याचा इरादा जाहिर करणे, कलम 24 नुसार " नगर रचना अधिकारी " यांची नियुकी करणे बाबत.

1)शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि.पी. एस. नं 1702/454/सीआर-52/ओ/युडी-13, दि.15 ऑक्टोबर 2004 अन्वये सोलापूर महानगरपालिका शहरासाठी द्वितीय सुधारित विकास योजना (1997-2004) मंजूर असून ती दि.16 डिसेंबर 2004 पासून अंमलात आलेली आहे व सदर विकास योजनेच्या वगळलेल्या भागास ईपी नं-1707/818/सीआर-709/07/युडी-13 दि.07/08/2008 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानंतर सोलापूर शहरातील जुळे सोलापुर भाग 1 व 2 ची पहीली सुधारीत विकास योजना न. वि. विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस/1715/1057/सीआर-286/15/डीपी सॅन्क्शन/युडी-13 दिनांक 09-01-2016 अन्वये मंजुर झालेली आहे व ती दिनांक 28/09/2016 पासून अमंलात आहे.

सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.157 दिनांक 20/02/2021 अन्वये GIS प्रणाली वापरुन नव्याने जुळे सोलापूर 1 व 2 यासह संपूर्ण सोलापूर शहराची एकत्रित तृतीय विकास योजना (2024-2044) करणेस व ठराव क्र. 157 दिनांक 24/09/2021 अन्वये विकास योजना तयार करणे व नगर रचना सोलापूर महानगरपालिका यांना सहकार्य करणेसाठी शासनाच्या निवडसुची मधील खाजगी संस्थांकडून मान्यता दिलेली निविदा प्रकिया अंती सल्लागार कंपनी RSI, हेद्राबाद यांची नेमणूक करणेस व सदरची सुधारित विकास योजना करणेकरिता स्वतंत्र DP युनिट स्थापन करणेस खर्चासह मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र विघयो-3821/1961/प्र.क्र.307/नवि-27 दि.10/10/2022 अन्वये सोलापूर शहराची वि. यो. सुधारित करण्यासाठी नगर रचनाकार वि.यो.वि.घ. सोलापूर मनपा, सोलापूर हे स्थानांतरित केलेले आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये सोलापूर महानगरपालिका तृतीय सुधारीत विकास योजना (2024-2044) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार सोलापूर महानगरपालिकाच्या तृतीय सुधारीत विकास योजने मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा व मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी स्वाक्षांकिंत केलेला नकाशा, सोलापूर महानगरपालिकेच्या नगर रचना कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा.

विकास योजना तयार करण्याचा सोलापूर महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावा. सदरची सूचना महाराष्ट्र

शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांचे कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना / हरकतीचा विचार, विकास योजना तयार करतांना करण्यात यावा.

2) तसेच विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरिता, त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन शासनाकडे सादर करण्यासाठी त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरिता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. "नगररचना अधिकारी " मा. सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांची पूर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर " नगररचना अधिकारी " यांच्या नियुक्तीचे ओपचारीक आदेश मा. आयुक्त, सोमपा यांनी पारीत करावे.

विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे तसेच उक्त अधिनियमाचे तरतूदीनुसार मुदतवाढ मंजूर करण्याची अधिकार मा. आयुक्त, सोमपा यांना देण्यात येत आहेत. तद्संबंधी लागणा-या सर्व खर्चास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा असितत्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.11/03/2022 ने गठीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचेकडे <u>मंजूरीस्तव</u> पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.20/10/2022 ने आलेले प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

(प्रविण प्र. दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा. प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

ठ. ९६ १०६
पान 2/2

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.१०७ ठराव क्र.१०७ दिनांक.०३/११/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१०७

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर मालकीच्या गट क्र. व उपविभाग ३८/१/क/२ क्षेत्र ०.८० हेक्टर व गट क्रं व उपविभाग क्र.४४/अ/पैकी क्षेत्र ०.८० हेक्टर असे एकुण जागेचे क्षेत्रफळ १.६० हेक्टर म्हणजे १६००० चौ.मी इतके असून प्रस्तुत ठिकाणी हायवे अॅमेनटी सेंटर बांधणेकामी मा.सर्वसाधारण ठराव क्र. ४४५ दि.०५/०२/२०२२ अन्वये पारित झाला आहे. सदरच्या ठरावास अनुसरून इमारत बांधणेकामी जाहिरप्रसिध्दीकरण करून मुल्यनिविदा मागविली असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर नमूद ठिकाणी सुधारित योजना तळमजला व परिसर सुधारणा करणेकामी सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र.५० र.रु.११,९१,९१,६६८.०० इतकेचे तयार करण्यात आले असून यास मा.नगरअभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. उपरोक्त नमूद ठिकाणी मूळ योजना तळमजला, पहिला मजला दुसरा मजल्याची भाडेदरानुसार ई- ऑक्शन प्रणालीच्या माध्यमातून प्रतिसादर न मिळाल्याने प्रस्तुत प्रकरणी स्कोप ऑफ वर्क कमी करून व तसेच मा.सहा.संचालक नगर रचना यांनी त्यांच्याकडील दि.२१/११/२०२१ अन्वये देण्यात आलेल्या भाडेदरानुसार गाळ्याचे भाडे प्रति चौ.मी. कपात करून कपातीच्या दरानुसार ई- ऑक्शन करणेबाबत मा.आयुक्त यांनी आदेश दिले होते. यानुसार प्रस्तुत सुधारीत योजनेचा तळमजलाकरीता ई-ऑक्शन जाहिंरप्रसिध्दीकरण दि.१५/०७/२०२२ देण्यात आले होते. सदरच्या जाहीरप्रसिध्दीकरणास कोणतेही स्वरुपाचे प्रतिसाद मिळाले नाही. यामुळे मा.आयुक्त यांनी वर नमूद ठिकाणच्या मोकळ्या जागेकरीता (पेट्रोलपंप साठी राखीव असलेल्या जागे व्यतिरिक्त उर्वरीत जागा) ई -ऑक्शन ने हायवे अॅमेनीटी सेंटर या वाणिज्य वापरामधील फुड कोर्ट / इलेक्ट्रीक चार्जिंग स्टेशन -सर्व्हिस एरिया / गार्डन / पार्किंग करीता जाहिर प्रसिध्दीकरण करणेकरीता आदेश दिलेले आहेत. नमूद ठिकाणी बांधकाम व परिसर विकास कामासाठी अंदाजे र.रु.११,९१,९१,६९०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च हा वर नमूद ठिकाणाचे इमारत बांधकाम व परिसर सुधारणा करणेसाठी र.रु.३२,३८९.०० प्रती चौ.मी इतका होत असून यामध्ये वर नमूद ठिकाणाचे बांधकाम व नमूद ठिकाणाचे बांधकाम व नमूद केलेले विकास कामे यांचा अंतर्भूत समावेश आहे.वरील प्रमाणे बांधकाम व परिसर विकास कामासाठी संबंधीत लिलाव पात्र धारकाने खर्च केलेनंतर २९ वर्षे ११ महिनेनंतर/ करारपत्राची मुदत संपल्यानंतर जागेवर वर नमूद ठिकाणी बांधकाम केलेली इमारत व इतर कामे जागेवर आहे त्या स्थितीत म.न.पा. च्या ताब्यात देणेची आहेत तेव्हा सदर बांधकामासाठी होणारा खर्चापैकी काही रक्कम पात्र लिलाव धारकास खर्च रकमेच्या किती रक्कम २९ वर्षे ११ महिनेनंतर परत द्यावयाचे आहे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस व प्रस्तुत प्रस्तावानूसार अ,ब,क व ड मध्ये नमूद केलेले नुसार कार्यपध्दती निश्चित करणेकामी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. यास्तव मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे. तसेच क मध्ये नमूद प्रमाणे मान्यता द्यावयाचे झाल्यास पात्र लिलाव धारकास जागेवरील बांधकाम व विकासापोटी २९ वर्षे ११ महिनेनंतर काही रक्कम लिलावपात्र धारकास परत द्यावी लागणार आहे याबाबत सदर मंजूर लिलावपात्र धारकास २९ वर्षे ११ महिनेनंतर द्यावयाच्या रकमेबाबत प्रस्तावित नमूद प्रमाणे योग्य तो निर्णय होणेस

बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे २०/१०/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावात नमूद अ, ब व ड यास धोरणात्मक मान्यता देण्यात येत आहे. क मध्ये नमूद प्रमाणे २९ वर्षे ११ महिनेनंतर काही रक्कम लिलाव पात्र धारकास परत द्यावी ही बाब नामंजूर करण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

## सोलापूर महानगरपालिका

## प्रशासक ठराव

## विषय क्र.१०८ ठराव क्र.१०८ दिनांक.०३/११/२०२२

## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१०८

तुळजापूर रोड येथील जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग करून त्यामध्ये निघणारे inert वेस्ट करीता लागणारी लँडफिल विकसित करणेच्या अनुषंगाने तुळजापूर रोड येथी कचरा डेपो येथे जून्या कचऱ्यावर बायोमायनिंग करून त्या माध्यमातून inert Material साठी SWM मार्गदर्शन / नियमावली नुसार सॅनिटरी लँडफिल साईट विकसीत करणेकामी प्राप्त परिस्थीती नुसार, अंदाजपत्रक र.रु.९,८४,६२,९१२/- इतकेचे तयार केले आहे त्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे T.S अंती प्रस्तुत रक्कम मध्ये कमी अथवा जास्त होणेची शक्यता नाकारता येत नाही. सबब यांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून तांत्रिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेस व येणारा खर्च **बजेट** - SWM -२ मध्ये खर्ची टाकणेस तसेच प्रस्तुत कामापोटी स्वच्छ भारत मिशन (भाग -२) अंतर्गत अनुदान मागणी करणेकामी मा.सर्वसाधारण सभेची प्रस्तावित प्रमाणे मान्यता मिळणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२१/१०/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.१०९ ठराव क्र.१०९ दिनांक.०३/११/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**

१०९

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे शेळगी येथील महानरपालिकेच्या भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब या जागा मंजुर विकास योजना नुसार रहिवास विभागात समाविष्ठ आहे. सदर जागा रहिवास विभागातून, C&D Waste Plant चे आरक्षण ठेवणेबाबत चे मा.आयुक्त यांचे दि.२०/१०/२०२२ अन्वये आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले

शासनाकडील निर्णय क्र.स्वमअ-२०२०/प्रक्र२३/नवि-३४ दि.२८/०१/२०२० अन्वये सोलापूर शहराकरीता १५० (TPD) प्रकल्प क्षमता असलेला C&D Waste Plant तयार करणेसाठी प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. त्यामुध्ये एकूण प्रकल्प किंमत र.रु.७.५२३५ कोटी प्रकल्प किंमत असून त्यातील केंद्र शासन हिस्सा ३५% म्हणजेच (र.रु.२.६३३३ कोटी) राज्य शासन हिस्सा २३.३% म्हणजेच (र.रु.१.७५३ कोटी) व उर्वरित म.न.पा.हिस्सा र.रु.३.१३७३ कोटी प्रमाणे मंजुर करणेत आलेले आहेत.

प्रकरणी मौजे शेळगी हद्दीतील म.न.पा. मालकीचे भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब या जागेचा मंजुर विकास योजना आराखडा (१९९७-२०१७) नुसार रहिवास वापर विभागात समाविष्ठ आहे. नमुद ठिकाणी उपरोक्त प्रकल्प राबविणेचे असल्याने जागेच्या वापरात बदल करणे आवश्यक आहे. त्याकरीता म.प्रा.व न.र. १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी लागणार आहे.

म.न.पा. हद्दीतील मौजे शेळगी येथील महानरपालिकेच्या भुमापन क्र.६४(ब१) तसेच सरकारी मालकीचे भुमापन क्र.६५/अ/१अ/२अ व ६५/ब जागेच्या रहिवास विभागातून C & D Waste Plant चे आरक्षण ठेवणेकामी म.प्रा.व न.र. अधिनियम चे १९६६ चे कलम ३७ नुसार बदल करणेस तसेच म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी जाहिरप्रसिध्दीकरण करुन प्राप्त झालेल्या हरकती सुचना यावर सुनावणी घेऊन अंतिम फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतु सो.म.पा. मध्ये सध्या सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व प्रशासकीय कार्किद चालू असल्यामुळे दि.११/०३/२०२२ ने गटीत झालेल्या उपसमिती मार्फत मा.प्रशासक यांचेकडेस **मान्यतेस्तव** पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२०/१०/२०२२ च्या मान्यतेने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दतकाळे)
**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

(सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय)

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**प्रशासक**
**सोलापूर महानगरपालिका**